रविवार, ०३ सप्टेंबर २०१७

तरुण भारत
www.tarunbharat.org

PRECISION

# प्रिसिजन कॅमशाफ्टस लिमिटेड

"सीआयएन" - L24231PN1992PLC067126
नोंदणीकृत कार्यालय – ई १०२/१०३ "एम आय डी सी",
अक्कलकोट मार्ग, सोलापूर ४१३००६ महाराष्ट्र
फोन: +९१ ९१६८६४६५३१ /३२/३३, फॅक्स: +९१ ०२१७ २३५७६४५
संकेतस्थळ (www.pclinda.in) ई-मेल - sskuber@pclindia.in

## सूचना

सूचना देण्यात येत आहे की प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेडची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (सभा) बुधवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी दुपारी ३ वाजता, प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेड, डी–५, चिंचोळी एमआयडीसी, सोलापूर–४१३ २५५ येथे, १० ऑगस्ट २०१७ रोजी देण्यात आलेल्या सभेच्या सूचनेत नमूद व्यवसायावर विमर्श करण्याकरिता आयोजित करण्यात आली आहे.

कंपनी कायदा, २०१३ (कायदा) च्या कलम १०१ आणि १३६ तसेच कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन), नियम २०१४, अंतर्गत आर्थिक वर्ष २०१६–१७ साठीच्या लेखापरीक्षित केलेल्या अहवालाची प्रत आणि सभेच्या सूचनेची प्रत कंपनी किंवा ठेवप्रत सहभागींकडे ई–मेल पत्ता नोंद असलेल्या सदस्यांना ई–मेल द्वारे १ सप्टेंबर २०१७ रोजी पाठवण्यात आली आहे. ई–मेल पत्ता नोंद नसलेल्या सदस्यांसाठी वरील कागदपत्रांच्या प्रती नियमानुसार असलेल्या पर्यायाने त्यांना त्यांच्या रजिस्टर्ड पोस्टल पत्त्यावर पाठवल्या आहेत. २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची रीतसर सूचना आणि आर्थिक वर्ष २०१६–१७ साठीच्या लेखापरीक्षित केलेल्या अहवालाची प्रत कंपनीच्या संकेत स्थळावर (www.pclindia.in) उपलब्ध आहे.

पुढे अशी सूचना देण्यात येते की, आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी, संचालक मंडळाने भागधारकांना एका भागासाठी रु १.५० अंतिम लाभांश देण्याचे सुचवले आहे आणि त्यासाठी भागधारकांची पात्रता ठरवण्यासाठी, कंपनी कायदा २०१३ च्या नियम ९१ अनुसार कंपनीच्या सभासदांची नोंदवही आणि हस्तांतरण पुस्तिका गुरूवार, २१ सप्टेंबर २०१७ पासून बुधवार, २७ सप्टेंबर २०१७ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट) बंद राहील. सभेत सभासदांनी मंजूर केल्यास, अंतिम लाभांशासाठी २० सप्टेंबर २०१७ ही निर्णायक तारीख ठरवण्यात आली आहे आणि या तारखेला असलेले भागधारक हे 'पात्र सदस्य' समजण्यात येतील. सदरचा लाभांश मंजूर झाल्यास त्याची देयक तारीख ही मंगळवार दिनांक १० ऑक्टोबर २०१७ अशी असेल.

कंपनी कायदा २०१३ तसेच कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन), नियम २०१४ आणि सेबी नियमनाचे अनुसार, सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावावर मतदान करता यावे यासाठी कंपनी, आपले सभासद, ज्याकडे कंपनीचे समभाग २० सप्टेंबर २०१७ (निर्णायक तारीख) रोजी असतील अशा पात्र सदस्यांना नॅशनल सिक्युरिटीज डिपॉजिटरीज लिमिटेडच्या मदतीने दूरस्थ ई–मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दूरस्थ ई–मतदान सुविधेचा वापर करून, पात्र सभासद, सभा सूचनेमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही किंवा सर्व विषयावर मतदान करू शकतात. दूरस्थ ई–मतदान रविवार, २४ सप्टेंबर, २०१७ रोजी सकाळी ९ वाजता प्रारंभ होईल आणि मंगळवार, २६ सप्टेंबर, २०१७ रोजी सायंकाळी ५ वाजता समाप्त होईल व त्यानंतर ई–मतदान करता येणार नाही. पात्र सदस्याने एकदा मतदान केल्यानंतर ते मत बदलू शकत नाहीत. सदस्यांना ई–मतदान सुविधेचा वापर करता यावा यासाठी सभासूचनेसह ई–मेल किंवा रजिस्टर्ड पोस्टद्वारे दिलेल्या पत्त्यावर युजर आयडी व पासवर्ड पाठवला आहे. दूरस्थ ई–मतदानाची पद्धत आणि प्रक्रिया कंपनीच्या सर्वसाधारण सभेच्या सूचनेत देण्यात आली आहे आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉजिटरीज लिमिटेडच्या संकेतस्थळावर www.evoting.nsdl.com उपलब्ध आहे.

ज्या सदस्याला उपस्थित राहण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार आहे, असे सदस्य आपला प्रतिनिधी नेमू शकतात व सदरचा प्रतिनिधी कंपनीचा सदस्य असण्याची गरज नाही. प्रतिनिधी नेमण्याची कागदपत्रे वैध करून घेण्यासाठी, सभेची सुरूवात होण्याच्या ४८ तासांच्या आधी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये पोहोचणे गरजेचे आहे.

ज्या सदस्यांनी ई–मतदान पद्धतीने मतदान केलेले नाही, अशा सदस्यांना सभेच्या वेळी, मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात येईल. ज्या सदस्यांनी ई–मतदान पद्धतीने मतदान केलेले आहे त्यांना परत मतपत्रिकेद्वारे मतदान करता येणार नाही.

ई–मतदानासंदर्भात काही शंका व तक्रार असल्यास सदस्यांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा–

१. श्री. स्वप्नील कुबेर, कंपनी सचिव व कम्प्लायन्स ऑफिसर – ई–मेल sskuber@pclindia.in किंवा

२. नॅशनल सिक्युरिटीज डिपॉजिटरीज लिमिटेडच्या संकेतस्थळावर www.evoting.nsdl.com सदस्यांना 'एफएक्यू' सदरामध्ये माहिती मिळू शकते.

**प्रिसिजन कॅमशाफ्टस लिमिटेडसाठी**

**स्वप्नील कुबेर**
**कंपनी सचिव आणि कम्प्लायन्स ऑफिसर**

तारिख : **३, सप्टेंबर २०१७**
स्थळ: **पुणे**